


आशीष रायचूर

**केवळ विनामूल्य वितरणासाठी**
**ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे मुद्रित व वितरित.**
**प्रथम संस्करण मुद्रित,**

**संपर्क** : All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA
Phone: +91-80-25452617
Email: bookrequest@apcwo.org
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, बायबलचे सर्व संदर्भ पवित्र बायबल, बायबल सोसायटी ऑफ इंडिया आवृत्तीतून घेण्यात आले आहेत. सर्व हक्क स्वाधीन.

बायबल व्याख्या, इब्री व ग्रीक शब्द तसेच त्यांचे अर्थ खालील पुस्तकांतून घेण्यात आले आहेत:
Thayer's Greek Definitions, Published in 1886,1889; public domain
Strong's Hebrew and Greek Dictionaries, Strong's Exhaustive Concordance by JamesStrong, T. D.LLD. Published in 1890; public domain
Vine's Complete Expository Dictionary of Old and New Testament Words,@1984,1996, Thomas Nelson, Inc, Nashville, TN.

**आर्थिक साझेदारी**

**या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**डाक यादी**

आमची नवीन पुस्तके मिळविण्यासाठी आपणास आपले नाव आमच्या डाकयादीत नोंदवावयाचे असल्यास कृपया ईमेलद्वारे आपला अचूक पत्ता आम्हास पाठवावा

**apcwo.org**

**भारतात विनामूल्य बल्क**

# वैय्यक्तिक आणि
# पिढीजात बंधने तोडणे

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| परिचय | 1 |
| 1. पिढीजात बंधन म्हणजे काय? | 4 |
| 2. अधर्म आणि पाप | 10 |
| 3. कौटुंबिक बंधनांसाठी कोणत्या गोष्टीमुळे दारे उघडतात? | 13 |
| 4. वैय्यक्तिक आणि कौटुंबिक बंधने ओळखणे | 18 |
| 5. आपण यापासून मुक्त होऊ शकतो का? | 20 |
| सतत विचारले जाणारे प्रश्न | 26 |
| तयारी | 32 |
| प्रार्थना | 33 |

# परिचय

लोक ज्या समस्यांना तोंड देतात त्यांच्यापैकी काहींचे मूळ मागील पिढ्यांमध्ये आढळते. यापैकी काही अशा व्यक्तीद्वारे उत्पन्न झाले असतील जे मागील पिढीत पापमय जीवनशैली घालवित होते, अथवा दुरात्म्यांच्या क्रियाकलापात गुंतलेले असतील. उदाहरणार्थ, एका कुटुंबात आजोबाने उधळेपणाचा अनुभव घेतला असेल, आणि ही समस्या त्यांच्या मुलांपैकी एकाला प्राप्त झाली असेल. या मुलास मुले झाली असतील आणि त्यांच्यापैकी काही उधळी असतील. म्हणून, पिढ्यान्‌पिढ्या एक किंवा त्यापेक्षा अधिक लोक सारख्याच समस्यांनी गांजलेले असू शकतात.

दुसऱ्या उदाहरणाचा विचार करा जेथे आजोबाला दारू पिण्याची गंभीर सवय असेल. नंतर जीवनात त्यांचा मुलगा सुद्धा दारूबाज निघतो आणि हे तिसऱ्या पिढीपर्यंत चालत जाते. हा आकृतीबंध असू शकतो जेथे त्या सर्वांना सारख्याच समस्यांना तोंड द्यावे लागते. कुटूंबवृक्षात काही असू शकते - आणि फक्त व्यक्तीमध्ये नाही - ज्यामुळे असा आकृतीबंध पिढ्यान्‌पिढ्या चालत राहतो. अशा वारंवार घडणाऱ्या समस्यांचे कारण काय असू शकते - जीवनशैलीचे वर्तन, जीवनानुभव, संकटे इत्यादी. पिढ्यांमध्ये वारंवार दिसून येणाऱ्या या समस्यांमागे आध्यात्मिक कारणे आहेत का? असे असेल तर, आम्ही फक्त वर वर लक्षणे दूर करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्यात सखोल गेले पाहिजे. आम्हाला मूळ कारण दूर करावे लागेल ज्याचे स्वरूप आत्मिक देखील असू शकते.

## पिढीजात बंधनांची कारणे

आमच्या जीवनात ज्या समस्यांना आम्ही तोंड देतो त्या पिढीजात बंधनामुळे असू शकतात - पापमय वर्तन आणि जीवनशैलीचे नमूने जसे खोटे बोलणे, लुबाडणे, क्रोध, हिंसा, जुगार, दारूबाजी, मादक पदार्थांवर अवलंबून राहणे, व्यभिचार, अनैतिकता, विनाशकारक व्यक्तिमत्व, शोषण, आत्महत्येची प्रवृत्ती, सतत काम करीत राहणे, आणि या सारख्या अनेक गोष्टी. ही यादी वाढतच जाते. जीवनातील इतर समस्या - वारंवार आजारी पडणे, घटस्फोट, आर्थिक उधळेपणा, वारंवार व्यापारात तोटा होणे, इतर क्षेत्रात विफलता, नैराश्य, मानसिक/भावनात्मक हताशा, भिती, असुरक्षिततेची भावना, स्वतःविषयी हीनभावना, तिरस्कार, दारिद्र्य, खानपानाच्या समस्या, लग्नाच्या बंधनावाचून जन्मलेली मुले, शारीरिक अथवा भावनात्मक विकार, वांझपण, गर्भपात, वारंवार अपघात घडणे, “अपघाताची प्रवृत्ती” असणे, आणि अस्वाभाविक किंवा अकाल मृत्यू या समस्यांमागे “पिढीजात बंधने” असू शकतात.

## सार्वत्रिक समाधान नाही

या अभ्यासात पुढे वाढण्यापूर्वी आम्ही हे समजले पाहिजे की आमच्या जीवनात असलेली पिढीजात बंधने मोडून काढणे हे आम्ही तोंड देत असलेल्या प्रत्येक समस्येचे समाधान नाही. पिढीजात बंधनास समजून घेण्याद्वारे आणि मोडण्याद्वारे जीवनातील सर्व समस्या सोडविल्या जातील हे जरूरी नाही. समस्येचे कारण नेहमीच पिढीजात बंधन नसेल. उदाहरणार्थ, एखाद्यास सारखी डोकेदुखी होत असेल याचे कारण केवळ हे असू शकते की तो पुरेशी झोप घेत नाही, त्याचे कारण पिढीजात बंधन नाही! म्हणून आमच्यासाठी जरूरी आहे की एखादी समस्या पिढीजात बंधन आहे असा निष्कर्ष काढण्यापूर्वी आम्ही सावध असले पाहिजे. आम्ही हेच जाणले पाहिजे आणि त्यानुसार जगले पाहिजे असे नाही. समस्या उत्पन्न करणारी इतर अनेक कारकेही असू शकतात.

## इतर कारक

काही निश्चित पापमय वर्तनांचे आकृतीबंध एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचविले जातात, त्याचवेळी त्यात इतर कारकांचा देखील समावेश असू शकतो. आध्यात्मिक कारणांशिवाय, वैय्यक्तिक, आनुवंशिक, आणि वातावरणाशी संबंधित कारणेही असू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्यास मादक पदार्थांवर अवलंबून राहण्याची समस्या असेल याचे कारण हे नसेल की मागील पिढीतील कोणीतरी त्याचे सेवन करीत होता, पण केवळ हे असेल की त्या व्यक्तीने चुकीच्या प्रभावामुळे चुकीची जीवनशैली अंगी बाणली.

## सत्य जाणून घेण्याची आणि लागू करण्याची गरज

तथापि, आम्हास हे समजून घेणे महत्वाचे आहे की पिढीजात बंधने काय आहेत आणि हे जाणून घेणे की हे सत्य कसे लागू करावे, जेणेकरून जर पिढीजात बंधन हे समस्येचे मूळ कारण असेल, तर आम्ही जाणू की कायमचा उपाय शोधण्यासाठी काय करावे. जोवर आम्ही समस्येचे मूळ कारण दूर करण्याबाबत असमर्थ असू, तोवर आम्हाला कधीही त्याचे कायमचे समाधान प्राप्त होणार नाही. आम्हास हे स्वतःसाठी लागू करण्याची गरज आहे आणि त्याद्वारे इतरांची सेवा करणे देखील येते.

**इफिस 6:12**

**कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे.**

आमचा लढा “रक्त आणि मांसाशी” नाही - लोकांशी नाही - तर आत्मिक दुष्टतेशी, दुरात्म्यांच्या सैन्याशी, काळोखाच्या सत्तेशी, सैतानाशी, आणि त्याच्या दुरात्म्यांशी आहे जे आमच्यावर आक्रमण करण्याचा आणि आमच्या विरोधात येण्याचा प्रयत्न करतात. यात एक आध्यात्मिक लढा समाविष्ट आहे. म्हणून आम्ही तोंड देत असलेल्या काही समस्यांचे मूळ आत्मिक आहे.

परमेश्वराचे वचन आम्हाला ताकीद देते की आम्ही सैतानाला कुठलीही जागा देता कामा नये - “सैतानास वाव देऊ नका” (इफिस 4:27). त्याला कुठल्याही प्रकारचा प्रवेश न देण्याबाबत आम्ही सावध असले पाहिजे. आमच्यासाठी हे जाणणे महत्वाचे आहे की सैतान कसे कार्य करतो आणि आमच्या जीवनात कसा प्रवेश मिळवितो. तरच सैतानाचा यशस्वीरित्या कसा प्रतिकार करावा हे आम्हास कळून येईल. जर सैतान आमच्या जीवनांत कसा प्रवेश करतो हे जर आम्ही योग्यप्रकारे ठरवू शकलो नाही, तर त्याला आमच्या जीवनांतून कसे बाहेर ठेवावे हे आम्हाला समजणार नाही. जर आपण समस्येचे मूळ दूर करणार नाही, तर आम्ही जणूकाही “सावलीशी झुंज” देत असू - खऱ्या व्यक्तीऐवजी सावलीशी लढा देणे.

## शब्द आणि शब्दावली

बहुतांशी ख्रिस्ती जगात, “कौटुंबिक शाप” आणि “पिढीजात शाप” या शब्दांचा उपयोग केला जातो. या पुस्तकात, आम्ही “शाप” या शब्दाचा उपयोग करीत नाही. त्याऐवजी, आम्ही “बंधन” या शब्दाचा उपयोग करतो, केवळ यासाठी कारण आम्हास असे वाटते की हा अधिक व्यापक शब्द आहे आणि समस्येच्या स्वरूपाचे यथार्थ वर्णन करतो. “शाप” हा शब्द सामान्यतः मौखिक उच्चारणाचा उल्लेख करतो; असे काहीतरी जे आमच्या जीवनांवर उच्चारण्यात आले आहे. तथापि, आपण बंधनांच्या त्या क्षेत्रांशी व्यवहार करीत आहोत, जेथे शत्रूने कुटुंब वंशात प्रवेश मिळविला आहे आणि येणाऱ्या पिढ्यांद्वारे त्या कुटुंब वृक्षातील वेगवेगळया व्यक्तींस बंदीवान केले आहे. कधी कधी, आलटूनपालटून “कौटुंबिक शाप,” “पिढीजात शाप,” आणि “पिढीजात बंधन” या शब्दांचा उपयोग केला जाऊ शकतो. तथापि, महत्वाची गोष्ट सत्य समजणे आणि ते आमच्या जीवनांत लागू करणे आहे, मग वाटल्यास आम्ही कुठल्याही शब्दावलीचा उपयोग करीत असू.

# 1. पिढीजात बंधन म्हणजे काय?

**निर्गम 20:3-6**

**3 माझ्याशिवाय तुला वेगळे देव नसावेत.**

**4 आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नकोस; वर आकाशातील, खाली पृथ्वीवरील व पृथ्वीखालच्या जलातील कशाचीही प्रतिमा करू नकोस.**

**5 त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो;**

**6 आणि जे माझ्यावर प्रेम करतात व माझ्या आज्ञा पाळतात अशांच्या हजारो पिढ्यांवर मी दया करतो.**

प्रभूने दोन आज्ञा दिल्या. पहिली ही आहे की त्याच्यावाचून दुसरे वेगळे देव नसावेत, आणि दुसरे म्हणजे कोणीही कुठल्याही कोरीव मूर्तीपुढे वाकता कामा नये. प्रभू या आज्ञांचे उल्लंघन करण्याच्या परिणामांचा देखील उल्लेख करतो, आणि म्हणतो की हा अन्याय अनेक पिढ्यांपर्यंत, तिसऱ्या आणि चौथ्या पिढ्यांपर्यंत चालत राहील. येथे, आपण पाहतो की जर एखादी विशिष्ट पिढी खोट्या देवतांस किंवा मूर्तीस दंडवत करीत असेल, तर ती त्यांच्या जीवनात “अधर्म” किंवा अन्यायास प्रवेश करण्यासाठी दार उघडते आणि पुढील पिढ्यांपर्यंत सुरू राहते. याचा उल्लेख आपण “पिढीजात बंधन” म्हणून करतो.

या ठिकाणी पहिल्यांदा पिढीजात बंधनांची संकल्पना उल्लेखण्यात आली आहे. हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की हे स्वतः परमेश्वराने कळविले. म्हणून, पिढीजात बंधनाची संकल्पना लोकांद्वारे मानलेली “कल्पना” नव्हती ज्यांनी मनात भिती बाळगली होती किंवा पुढाऱ्यांद्वारे ज्यांनी भितीद्वारे लोकांस आपल्या कह्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. प्रभू परमेश्वराने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत अन्यायाच्या पोहोचण्याविषयी लोकांस सावधगिरीचा इशारा दिला.

हे विचार कमीतकमी आणखी इतर चार ठिकाणी उल्लेखिण्यात आले आहेत. म्हणून, आम्ही बायबलमधील एकट्या उदाहरणाच्या आधारे आपला धर्मसिद्धांत तयार करीत नाही. पवित्र शास्त्रात येथे चार ठिकाणी याची पुनरावृत्ती झालेली आहे :

**निर्गम 34:7**

**हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची)**

**मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.**

**गणना 14:18**

**‘परमेश्वर मंदक्रोध, दयेचा सागर, अन्याय व अपराध ह्यांची क्षमा करणारा, पण अपराधी जनांची मुळीच गय न करणारा असा आहे; तो वडिलांच्या अन्यायाबद्दल पुत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.’**

**अनुवाद 5:9**

**त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस, कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल शासन करतो.**

**यिर्मया 32:18**

**तू हजारांवर दया करतोस, बापांच्या अन्यायाचे प्रतिफल त्यांच्यामागे त्यांच्या मुलांच्या पदरी घालतोस; थोर पराक्रमी देव, सेनाधीश परमेश्वर हे तुझे नाम आहे.**

## मूर्तीपूजा

मूर्तीपूजा चुकीची आहे! परमेश्वर मूर्तीची उपासना करण्यास मनाई करतो. आम्हाला कोणत्याही कोरीव, कागदाच्या, इलेक्ट्रॉनिक, अथवा इतर कुठल्याही प्रकारच्या प्रतिमेची उपासना करावयाची नाही. आम्हाला खऱ्या आणि जिवंत परमेश्वराची उपासना, आत्म्याने आणि खरेपणाने करावयाची आहे. म्हणून, आपण काही महत्वाचे प्रश्न विचारू शकतोः

- मूर्तीपुढे अथवा प्रतिमेपुढे दंडवत करणे का चुकीचे आहे - मग ती येशूची मूर्ती असो, वा संताची, अथवा आणखी कोणाची?
- येशूच्या चित्राची उपासना करणे का चुकीचे आहे?

मूर्तीची उपासना करण्यासंबंधी पवित्रशास्त्र काय म्हणते याचा विचार करू या.

**1 करिंथ. 10:19-22**

**19 तर माझे म्हणणे काय आहे? मूर्तीला दाखवलेला नैवेद्य काहीतरी आहे, अथवा मूर्ती काहीतरी आहे,**

**असे माझे म्हणणे आहे काय? नाही;**
**20 तर असे आहे की, परराष्ट्रीय जे यज्ञ करतात 'ते देवाला नव्हे तर भुतांना करतात'; आणि तुम्ही भुतांचे सहभागी व्हावे अशी माझी इच्छा नाही.**
**21 तुमच्याने प्रभूचा प्याला व भुतांचाही प्याला पिववत नाही; 'प्रभूच्या मेजावरचे' व भुतांच्याही मेजावरचे तुमच्याने खाववत नाही.**
**22 आपण 'प्रभूला ईर्ष्येस पेटवतो काय?' आपण त्याच्यापेक्षा अधिक शक्तिमान आहोत काय?**

पवित्र शास्त्रानुसार, मूर्तीचे काहीही महत्व नाही, तथापि, मूर्तीच्या उपासनेत ज्या वस्तूंचे बलिदान केले जाते, त्या खरोखर दुरात्म्यांस बलिदान केल्या जातात, जिवंत परमेश्वरास नाही. याद्वारे व्यक्ती दुरात्म्यांच्या सहभागित्वात येतो, आणि दुरात्म्यांस त्यांच्या जीवनात प्रवेश करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. जेव्हा आपण परमेश्वराची स्तुति आणि उपासना करतो, तेव्हा जिवंत परमेश्वराशी आमचे सहभागित्व होते आणि तो आमच्या अंतःकरणांत व जीवनांत प्रवेश करतो. त्याचप्रकारे, जेव्हा कोणी मूर्तीसमोर वाकतो आणि त्यांची उपासना करतो आणि त्यांस बलिदान अर्पण करतो, तेव्हा तो या मूर्तींशी जुळलेल्या दुरात्म्यांच्या शक्तींशी सहभागित्व करू लागतो, आणि त्याद्वारे या शक्तींना आपल्या जीवनांत प्रवेश देतो.

## सावधगिरीचा शब्द

मूर्तीविषयी भक्तिभाव बाळगणाऱ्या आपल्या मित्रांना ही सत्ये सांगत असतांना आपण प्रेमाने आणि सौम्यतेने सत्य बोलावे.

**नीतिसूत्रे 16:12**
**जो मनाचा सुज्ञ त्याला समंजस म्हणतात. मधुर वाणीने शिक्षणाचा संस्कार अधिक होतो.**

अनुवाद 7 मध्ये, परमेश्वर आपल्या लोकांस मूर्तीविषयी विशिष्ट आज्ञा देतो.

**अनुवाद 7:25-26**
**25 त्यांच्या देवांच्या कोरीव मूर्ती तुम्ही अग्नीत जाळून टाका; त्यांच्यावरील सोन्यारुप्याचा लोभ धरू नकोस व ते स्वतःकरता ठेवून घेऊ नकोस, घेशील तर त्यामुळे पाशात पडशील; कारण तुझा देव परमेश्वर ह्याला त्याचा वीट आहे.**
**26 कोणतीही अमंगळ वस्तू आपल्या घरी आणू नकोस, आणशील तर तूही तिच्याप्रमाणे नाशास पात्र ठरशील; तिचा अगदी वीट मान व तिचा पूर्णपणे अव्हेर कर, कारण ती नाशास पात्र ठरलेली वस्तू आहे.**

परमेश्वर आपल्या लोकांस शापित वस्तु आपल्या घरात न आणण्याविषयी ताकीद देतो. त्यांना मूर्तींना सजविणारे मूल्यवान दागिने देखील आणण्याची परवानगी नव्हती. या गोष्टींचा परमेश्वरास तिटकारा होता - त्याला या गोष्टींचा वीट होता. जे लोक शापित वस्तु घरी आणतात ते मूर्तींशी संबंधित सामर्थ्याच्या बंधनात येतात. बंधन आणि विनाश त्यांच्या जीवनात प्रवेश करील. मूर्ती का वाईट आहेत याचे हे दुसरे कारण आहे. मूर्तींच्या मागे जी शक्ती आहे ती आम्हास बंधनात ठेवील आणि या बाबतीत जर आम्ही परमेश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन करू तर आमचा देखील मूर्तींसमान नाश होईल.

ज्याची आम्ही उपासना करतो त्याच्यासारखे आम्ही बनतो. “त्या बनविणारे व त्याच्यावर भाव ठेविणारे सर्व त्यांच्यासारखे बनतात” (स्तोत्र 115:8). आम्ही उपासना करीत असलेल्या वस्तूंची समानता आम्ही धारण करतो. जेव्हा आम्ही मूर्तीस दंडवत करतो आणि तिची उपासना करतो, तेव्हा त्या मूर्तीद्वारे कार्य करणाऱ्या आत्म्याला आमच्या जीवनात जागा (प्रभावाचे क्षेत्र) मिळते आणि तो आम्हास बंधक बनवितो, आणि वारंवार त्यास दंडवत करण्यास आम्हाला प्रेरित करतो. अशाप्रकारे आमच्याकडून हे आमच्या मुलांना आणि त्यांच्या मुलांना, वंश वृक्षाद्वारे येणाऱ्या पुढील पिढींना प्राप्त होते, आणि ते देखील मूर्तीस दंडवत करू लागतात.

## वैय्यक्तिक बंधन विरुद्ध पिढीजात बंधन

ज्या अनीतिस आम्ही आमच्या जीवनांत प्रवेश देतो, ज्या आम्हास आज प्रभावित करतात, त्यांनाच आम्ही “वैय्यक्तिक बंधन” म्हणून उल्लेख करू. जर आम्ही त्यांचे सामर्थ्य आमच्या जीवनात मोडले नाही, तर त्याच्यामध्ये आमच्या येणाऱ्या पिढींत पुढे वाढत जाण्याची क्षमता असते. जर हे येणाऱ्या पिढ्यांतही दिसून येत असेल तर त्याचा उल्लेख “पिढीजात बंधन” म्हणून करण्यात येतो. काही लोक पिढीजात बंधनाखाली दुःख सोसत असतील, जे त्यांना वारश्याने मिळाले असेल, आणि जरूरी नाही की त्यांनी आपल्या जीवनांत त्याची अनुमति दिली असावी. पूर्वी सांगितल्याप्रमाणे, ही बंधने अनेक प्रकारच्या गोष्टी असू शकतात - पापमय आचरण आणि जीवनशैलीचे आकृतीबंध, जसे खोटे बोलणे, फसवणूक करणे, राग, हिंसा, जुगार, दारूबाजी, मादक पदार्थांवर अवलंबून राहणे, व्यभिचार, अनैतिकता, विनाशकारक व्यक्तिमत्व, शोषण, आत्महत्येची प्रवृत्ती, गरजेपेक्षा जास्त काम करणे, इत्यादी. जीवनातील इतर समस्या - वारंवार आजारी पडणे, घटस्फोट, आर्थिक उधळेपणा, व्यापार उद्योगात वारंवार अपयश, इतर क्षेत्रांत अपयश, नैराश्य, मानसिक/भावनात्मक विकार, भिती, असुरक्षिततेची भावना, स्वतःविषयी हीन भावना, तिरस्कार, दारिद्र्य, खाण्यापिण्याची समस्या, विवाहबाह्य संबंधाद्वारे उत्पन्न मुले,

भौतिक किंवा भावनात्मक विकार, वांझपण, गर्भपात, वारंवार अपघात घडणे, "अपघाताची प्रवृत्ती असणे," आणि अस्वाभाविक किंवा अकाल मृत्यू, आणि त्या सारख्या गोष्टी सुद्धा बंधनांमुळे असू शकतात.

येथे आमचा हेतू वैय्यक्तिक आणि पिढीजात बंधने कशी तोडावी हे शिकणे आहे.

## लोभ मूर्तीपूजा आहे

जुना करार मूर्तींपुढे आणि प्रतिमांपुढे दंडवत घालण्याचा उल्लेख मूर्तीपूजा असा करतो. तथापि, नव्या करारात यास थोडे व्यापक चित्र प्राप्त होते जेथे लोभाचा उल्लेख एक प्रकारचे मूर्तीपूजेचे स्वरूप म्हणून करण्यात आला आहे.

**कलस्सै 3:5**

**तर पृथ्वीवरील तुमचे अवयव म्हणजे जारकर्म, अमंगळपणा, कामवासना, कुवासना व लोभ ह्याला मूर्तिपूजा म्हणावे हे जिवे मारा.**

**इफिस 5:5**

**जारकर्मी, अशुद्ध कृती करणारा किंवा लोभी (हा मूर्तिपूजक आहे), असल्या कोणालाही ख्रिस्ताच्या व देवाच्या राज्यात वारसा नाही हे तुम्ही जाणूनच आहात.**

लोभाचे अथवा असंयमित वासनेचे कुठलेही स्वरूप मूर्तीपूजेच्या बरोबरीचे आहे. उदाहरणार्थ, जर एखाद्यामध्ये अनियंत्रित इच्छा - व्यसन - असेल तर त्यास सुद्धा मूर्तीपूजा समजले जाते आणि त्याचे देखील सारखेच परिणाम आहेत. व्यसनामध्ये वस्तूंचा गैरवापर, अश्लीलता, दारूबाजी, अनैतिक जीवनशैली, इत्यादींचा समावेश आहे. मूर्तीपूजेशी जुळलेले आत्मे सक्रिय होऊ शकतात आणि त्या व्यक्तीस बंधनात आणू शकतात. म्हणून जरी आमच्या घरात खरोखर मूर्ती नसतील, तरीही आम्ही आमच्या अंतःकरणांचे परीक्षण केले पाहिजे की तेथे लोभ आहे का.

## पिढीजात आशीर्वाद

दुसरीकडे, बायबल आम्हाला पिढीजात आशीर्वादाविषयी शिकविते. पिढीजात आशीर्वादाचे उदाहरण अब्राहामाच्या जीवनात पाहता येते, जेथे परमेश्वर त्याला सांगतो की त्याला आणि त्याच्यानंतर त्याच्या संततीला आशीर्वाद प्राप्त होईल.

**उत्पत्ति 17:7**

**मी तुझा व तुझ्यामागे तुझ्या संतानाचा देव राहीन, असा निरंतरचा करार मी तुझ्याशी आणि तुझ्या**

**पश्चात तुझ्या संतानाशी पिढ्यानपिढ्या करतो.**

**यशया 59:21**

**परमेश्वर म्हणतो, “माझा तर त्यांच्याशी हाच करार; तुझ्यावर असलेला माझा आत्मा, तुझ्या मुखात घातलेली माझी वचने तुझ्या मुखातून, तुझ्या संतानांच्या मुखांतून व तुझ्या संतानाचे जे संतान त्यांच्या मुखांतून आतापासून पुढे सर्वकाळ निघून जाणार नाहीत, असे परमेश्वर म्हणतो.”**

खऱ्या आणि जिवंत परमेश्वरासोबत केलेला करार पिढीजात आशीर्वाद घेऊन आला.

# 2. अधर्म आणि पाप

## अधर्म विरुद्ध पाप

"अधर्म" (अन्याय) आणि "पाप" हे शब्द समजण्याद्वारे आम्हाला पिढीजात बंधनांचा अर्थ चांगल्याप्रकारे समजण्यात मदत प्राप्त होईल. दोन्ही शब्दांचा उपयोग पवित्र शास्त्रात करण्यात आला आहे :

**निर्गम 34:9**

**आणि तो म्हणाला, "हे प्रभू, तुझी माझ्यावर आता कृपादृष्टी झाली असेल तर प्रभूने आमच्याबरोबर चालावे; हे लोक ताठ मानेचे आहेत; तरी आमचा अन्याय व पाप ह्यांची क्षमा कर व आम्हांला आपले वतन समजून आमचा अंगीकार कर."**

"अधर्म" (अन्याय) या शब्दासाठी इब्री भाषेत दिलेला मूळ शब्द आहे *'avon'* ज्याचा अर्थ आहे विकृती, पण "पाप" या शब्दासाठी दिलेला शब्द आहे *'khatawaw'* ज्याचा अर्थ आहे अपराध. सामान्यतः, आपण एक निरीक्षण करू शकतो की "अधर्म" याचा संबंध आमच्या स्वभावाशी आहे, आमच्या आतील असे काही जे आम्हास पाप करावयास प्रवृत्त करते, तर "पाप" चुकीचे कार्य करणारे कृत्य आहे. कृत्य परमेश्वराच्या आज्ञेचे लक्ष्य चुकते किंवा उल्लंघन करते.

## अन्याय एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचतो

परमेश्वराने म्हटले की अन्याय एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचला होता. कोणीतरी पाप करतो पण अन्याय किंवा अधर्माने त्या व्यक्तीस पाप करावयास प्रवृत्त केले आणि ते एका पिढीपासून इतर पिढ्यापर्यंत पोहोचले. विलापगीत 5 मध्ये, आपण वाचतो की ज्या दुष्कर्मांनी पूर्वजांस पाप करावयास प्रेरित केले ते मुलांपर्यंत जाऊन पोहोचले.

**विलापगीत 5:7**

**आमच्या पूर्वजांनी पाप केले, ते नाहीसे झाले आहेत; आम्ही त्यांच्या दुष्कर्मांचे फळ भोगितो.**

**यिर्मया 32:17-18**

**17 'अहा प्रभू परमेश्वरा! पाहा, तू आपल्या महासामर्थ्याने व आपल्या उभारलेल्या बाहूने आकाश व**

**पृथ्वी उत्पन्न केली; तुला अवघड असे काही नाही.**

**18 तू हजारांवर दया करतोस, बापांच्या अन्यायाचे प्रतिफल त्यांच्यामागे त्यांच्या मुलांच्या पदरी घालतोस; थोर पराक्रमी देव, सेनाधीश परमेश्वर हे तुझे नाम आहे.**

**स्तोत्र 51:5**

**पाहा, मी जन्माचाच पापी आहे; माझ्या आईने गर्भधारण केले, तेव्हाचाच मी पातकी आहे.**
**आमच्या जन्म झालेपासून, अधर्म किंवा अन्याय आमच्यापर्यंत पोहोचला होता.**

याची परवानगी देण्याबाबत परमेश्वर न्यायी आहे का?

हे अन्यायपूर्ण वाटते की आमच्या एखाद्या पूर्वजाने मागील पिढीत केलेल्या दुष्कर्माचा परिणाम आम्हास सोसावा लागावा. आपण हे कसे समजवू शकतो?

असे दिसते की परमेश्वराने या बाबतीत अन्याय केला की पूर्वजांच्या अधर्माचा परिणाम मुलांवर, नातवंडांवर, आणि पुढील पिढ्यांवर घडून येतो. पुढे आपण इतर ठिकाणी वाचतो जेथे परमेश्वर हे अत्यंत स्पष्ट करतो की जो पाप करेल तो मरेल. खालील वचने पाहा :

**अनुवाद 24:16**

**मुलांसाठी बापांना जिवे मारू नये अथवा बापांसाठी मुलांना जिवे मारू नये; जो गुन्हा करील त्यालाच त्याच्या गुन्ह्याबद्दल जिवे मारावे.**

**यहेजकेल 18:1-4,20**

**1 परमेश्वराचे वचन मला प्राप्त झाले की,**

**2 "बापांनी आंबट द्राक्षे खाल्ली आणि मुलांचे दात आंबले, ही म्हण तुम्ही इस्राएल देशात वापरता ती का?**

**3 प्रभू परमेश्वर म्हणतो, माझ्या जीविताची शपथ, ही म्हण इस्राएलात ह्यापुढे तुम्हांला वापरायची नाही.**

**4 पाहा, सर्व जीव माझे आहेत, बापाचा जीव तसा पुत्राचा जीवही माझा आहे, जो जीवात्मा पाप करतो तो मरेल.**

**20 जो जीवात्मा पाप करील तोच मरेल; मुलगा बापाच्या पातकाचा भार वाहणार नाही, आणि बाप मुलग्याच्या पातकाचा भार वाहणार नाही; नीतिमानाला त्याच्या नीतिमत्तेचे फळ मिळेल; दुष्टाला त्याच्या दुष्टतेचे फळ मिळेल.**

वडीलांस त्यांच्या मुलांसाठी मृत्यूदंड दिला जाणार नाही. प्रत्येकाला त्याच्या स्वतःच्या

पापासाठी मृत्यू येईल. येथे इब्री भाषेत “पाप” हा शब्द मूळ शब्द *‘khate’* पासून आला आहे ज्याचा अर्थ आहे “अपराध.”

हे गोंधळात पाडणारे असू शकते. जेव्हा कमीत कमी पाच वचने अशी आहेत जी म्हणतात की अन्याय किंवा अधर्म मुलांद्वारे त्यांच्या मुलांपर्यंत पोहोचेल, ही दोन वचने अगदी विरोधाभासी वाटतात. उत्तम समज प्राप्त करून घेण्यासाठी, आम्हास “अन्याय” (अधर्म) आणि “पाप” यांच्यातील फरक स्मरण करण्याची गरज आहे.

## परमेश्वर न्यायप्रिय परमेश्वर आहे

परमेश्वर न्यायप्रिय आहे. या बाबत शंका नाही की परमेश्वर न्यायप्रिय आहे आणि त्याच्याठायी अन्याय नाही. आम्हाला न्यायसंस्थेद्वारे देण्यात येणारा “दंड” आणि दुष्कृत्याचा “परिणाम” यांच्यातील फरक समजण्याची गरज आहे. पापाचा दंड पाप करणाऱ्या व्यक्तीला भोगावे लागेल. त्या पापाचा परिणाम पाप करणाऱ्या व्यक्तीपेक्षा आणखी जीवनांस प्रभावित करू शकतो.

एका कुटुंबाचे उदाहरण घ्या जेथे वडील एका मोठ्या कंपनीत उच्च अधिकारी म्हणून काम करतात. बाप मोठ्या रकमेत हेराफेरी करतो आणि त्या देशाच्या कायद्याद्वारे तो दोषी ठरविला जातो आणि त्याला दहा वर्षांच्या बंदीवासाची शिक्षा दिली जाते. जरी त्याच्या पापाचा दंड त्याला एकट्याने भोगावा लागतो, अर्थात दहा वर्षांचा तुरूंगवास, तरीही - त्याची पत्नी, सर्व मुले, त्याची नातवंडेसुद्धा - त्याच्या अपराधाचा परिणाम भोगू शकतात. कुटुंबातील सदस्यांना खूप भावनात्मक वेदना सहन कराव्या लागतील आणि कुटुंबाची प्रतिष्ठा कलंकित होईल. शिक्षेपेक्षा परिणाम जास्त व्यापक आहेत.

अनुवाद 24 आणि यहेजकेल 18 मध्ये, परमेश्वर पापाच्या शिक्षेचा किंवा दंडाचा उल्लेख करतो - “जो पाप करेल तो मरेल” - पण इतर सर्व पाच संदर्भांत (निर्गम 20:3-6; निर्गम 34:7; गणना 14:18; अनुवाद 5:9; यिर्मया 32:18) जेथे आपण वाचतो की अन्याय एका पिढीपासून दुसऱ्या पिढ्यापर्यंत जातो, तेथे उल्लेख पापाच्या परिणामांचा आहे. काही पापे आहेत (उदाहरण, मूर्तीपूजा) ज्याच्यासाठी आम्ही त्या पापाचा केवळ दंडच भोगत नाही, तर त्याच्या उच्च परिणामास देखील तोंड देतो. दुरात्म्याच्या क्रियाकलापासाठी दार उघडते जे एका पिढीपासून दुसऱ्या पिढ्यांपर्यंत जाते. प्रत्येक पिढीस याचा परिणाम अनुभव करावा लागेल. म्हणून, परमेश्वर जेव्हा दुष्टास शिक्षा देतो, तेव्हा तो न्यायी ठरतो, जरी त्या व्यक्तीच्या पापाचे परिणाम त्याच्या संततीपर्यंत पोहोचतील. जोवर सुरू झालेल्या बंधनावर अधिकार घेऊन कोणी ते तोडत नसेल आणि त्याद्वारे स्वातंत्र्याचा दावा करीत नसेल, तोवर परमेश्वर त्यात हस्तक्षेप करणार नाही आणि ते थांबविणार नाही.

# 3. कौटुंबिक बंधनांसाठी कोणत्या गोष्टीमुळे दारे उघडतात?

## शापांमागे कारण असते

**नीतिसूत्रे 26:2**
**भ्रमण करणारी चिमणी व उडणारी निळवी ह्यांच्याप्रमाणे निष्कारण दिलेला शाप कोठेच ठरत नाही.**

शापांमागे कारण असते. शाप आपोआप घडून येत नाही. चिमणी आणि निळवी स्वैरपणे उडत नाहीत पण त्यांस “आंतरिक आवाक्याचे” मार्गदर्शन असते. त्याचप्रमाणे शाप योगायोगाने येत नाहीत; सामान्यतः शापामागे एक कारण असते. म्हणून, जेव्हा शाप कसे कार्य करतात याची आम्हास जाणीव असेल, तेव्हा आम्ही जाणू की त्यांस थांबविण्यासाठी आम्ही कोणती आवश्यक सावधगिरी बाळगली पाहिजे. आमच्या जीवनांत अधर्माचे दार उघडणाऱ्या व पिढीजात बंधनांस कारणीभूत ठरणाऱ्या काही कारणांचा विचार करू या.

### मूर्तींची अथवा खोट्या दैवतांची उपासना

याविषयी आम्ही पुस्तकात मागे विवेचन केले आहे. जेव्हा व्यक्ती खोट्या दैवतांपुढे दंडवत करते आणि खोट्या दैवतांची उपासना करते तेव्हा अधर्म किंवा अन्याय पुढील पिढ्यापर्यंत पोहोचतो (निर्गम 20:5).

### बलिदान किंवा अर्पणे

जेव्हा कोणी त्याच्या मुलाचे किंवा कुटुंबाचे अशा मूर्तीपुढे बलिदान करतो किंवा अर्पण वाहतो, ज्यास दुरात्म्याचा प्रभाव असतो - ते खोटे दैवत किंवा देवी असू शकते - तेव्हा त्याद्वारे कौटुंबिक बंधनांसाठी दार उघडते.

### शपथा

शपथ एक गंभीर प्रतिज्ञा आहे ज्याद्वारे व्यक्ती स्वतःला एखाद्या कृत्यास, सेवेस, अथवा एखाद्या परिस्थितीस बांधून घेतो. ज्या शपथा नकारात्मक, पापमय असतात, आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दुरात्म्यांपुढे घेतल्या जातात, तेव्हा दुरात्म्याच्या कार्यासाठी अथवा बंधनासाठी दार उघडते. उदाहरणार्थ, जर व्यक्ती काहीतरी करण्यासाठी मूर्तीपुढे शपथ वाहत असेल, आणि जर विशिष्ट प्रार्थनेचे उत्तर मिळाले, तर त्या शपथेद्वारे पिढीजात बंधनासाठी दार उघडू शकते.

**पापमय कृत्ये**

जे पाप कबूल करण्यात आलेले नाही ते असे दार उघडते ज्याद्वारे सैतानाच्या कार्यासाठी प्रवेश मिळतो. याचे उत्तम उदाहरण राजा दाविदाचे आहे (2 शमूएल 12), ज्याने बतशेबाची इच्छा धरून खून व व्यभिचार केला. नाथान संदेष्ट्याने दाविदाला ताकीद दिली की त्याच्या पापमय कृत्यामुळे तरवार त्याचे घर सोडणार नाही.

**2 शमूएल 12:9-13**

**9 तू परमेश्वराची आज्ञा तुच्छ मानून त्याच्या दृष्टीने वाईट असे हे कृत्य का केलेस? उरीया हित्ती ह्याचा तू तलवारीने घात केला, त्याची बायको आपल्या घरात घातलीस आणि उरीयाचा अम्मोन्यांच्या तलवारीने वध करवलास?**

**10 तर आता तलवार तुझे घर सोडणार नाही, कारण तू मला तुच्छ मानून उरीया हित्ती ह्याची स्त्री आपल्या घरात घातली आहेस.**

**11 परमेश्वर म्हणतो, पाहा, मी तुझ्याच घरातून तुझ्यावर अरिष्ट उभे करीन; तुझ्या स्त्रिया तुझ्यादेखत तुझ्या शेजाऱ्याला देईन; तो ह्या सूर्यादेखत त्यांची अब्रू घेईल.**

**12 तू ते काम गुप्तपणे केलेस, पण मी हे सर्व इस्राएलादेखत, ह्या सूर्यादेखत करीन."**

**13 दावीद नाथानाला म्हणाला, "मी परमेश्वराविरुद्ध पातक केले आहे," नाथान दाविदाला म्हणाला, "परमेश्वराने तुझे पातक दूर केले आहे; तू मरणार नाहीस.**

"तलवार" हा शब्द विनाश, हिंसा आणि मृत्यू यांना सूचित करतो. आपल्या पापमय कृत्याने, दाविदाने त्याच्या कुटुंबात विनाश, हिंसा आणि मृत्यूचे दरवाजे उघडले. दाविदाचा मुलगा, अम्नोनने त्याच्याच बहिणीवर बलात्कार केला आणि व्यभिचार केला. त्याचा दुसरा मुलगा अबशालोम याने स्वतःच्या वडिलांविरुद्ध बंड केले.

पापमय कृत्याचे परिणाम होतात; हे परिणाम कधीकधी आपल्या कल्पनेपेक्षा जास्त काळ टिकू शकतात. उदाहरणार्थ, गर्भपाताची जाणीवपूर्वक केलेली कृती विनाशाच्या अधर्माचे दार उघडू शकते जेथे गोष्टींचा नाश होऊ लागतो. जेव्हा कोणी गर्भपात करतात तेव्हा ते मृत्यूच्या भावनेचे दरवाजे उघडू शकतात ज्यामुळे इतर क्षेत्रांमध्ये नुकसान होऊ शकते, उदाहरणार्थ, व्यवसाय, वित्त इत्यादी. जे पाप कबूल केले जात नाही ते दुरात्म्यांच्या कारवायांसाठी खुले दार म्हणून राहते. आपल्या जीवनात पाप कबूल करणे, पश्चात्ताप करणे आणि त्यांचा त्याग करणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे. आपल्या जीवनात प्रवेश करण्याची वाट पाहत असलेल्या पापावर मात करण्याची जबाबदारी आपली आहे. कोणत्याही प्रकारच्या दुरात्म्याच्या कृत्यासाठी आपण दार बंद केले पाहिजे.

**उत्पत्ति 4:7**

**तू बरे केलेस तर तुझी मुद्रा प्रसन्न होणार नाही काय? पण तू बरे केले नाहीस तर दाराशी पाप टपूनच आहे; त्याचा रोख तुझ्यावर आहे. ह्याकरता तू त्याला दाबात ठेव."**

उत्पत्ति 4:7 मध्ये, परमेश्वर काईनशी बोलला, तो भयंकर अस्वस्थ होता आणि आपल्या भावाला मारण्यासाठी तयार होता. दाराशी वाट पाहणाऱ्या आणि आत जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या पापाबद्दल देवाने त्याला सावध केले. देवाने त्याला त्यावर मात करण्यास सांगितले. पण काईनने पापात प्रवेश केला आणि तो खुनी झाला.

### क्लेशकारक घटना किंवा अनुभव

भावनात्मक जखमांवरील नकारात्मक प्रतिक्रियांमुळे आपल्या जीवनातील अस्पष्ट भीतीचे दरवाजे उघडू शकतात, जे पुढील पिढ्यांमध्ये चालू राहू शकतात. उदाहरणार्थ, कार अपघातात सापडलेली एखादी व्यक्ती भावनात्मकरित्या इतकी विचलित होऊ शकते की त्या व्यक्तीच्या जीवनात भीतीची भावना प्रवेश करू शकते. ती व्यक्ती रस्त्यावरून प्रवास करण्यास खूप घाबरू शकते आणि पुन्हा कारमध्ये बसणे देखील असुरक्षित वाटू शकते. ही भीती नंतरच्या पिढ्यांनाही लागू शकते आणि इतर क्षेत्रांत भीती म्हणून प्रकट होऊ शकते. एखाद्या प्रिय व्यक्तीचे मरण, गैरवर्तन, दुःखद घटना पाहणे इतर क्लेशकारक अनुभवांची उदाहरणे असू शकतात जी लोकांना बंधनात आणतात.

### शाप आणि जादूटोणा

शाप आणि जादूटोणा साहजिकच आपल्या जीवनात पिढ्यांच्या बंधनांचे दरवाजे उघडतो. किमान तीन मार्ग आहेत ज्याद्वारे ते कार्यान्वित होतात.

### स्वतःला लादलेले शाप

नकळतपणे, आपले शब्द हे स्वतःला दिलेल्या शापांचा आधार ठरू शकतात. आपण काही गोष्टी अत्यंत दडपणाखाली, रागाने, द्वेषाने, दुखावलेल्या मनःस्थितीत आणि निराशेने बोलू शकतो. आपल्या स्वतःच्या शरीराबद्दल, आपल्या दिसण्याबद्दल, भावनांबद्दल आणि यासारख्या इतर गोष्टींविषयी नकारात्मक गोष्टी बोलण्याद्वारे आपण स्वतःवर शाप ओढवू शकतो. असे स्वतःवर ओढविलेले शाप लोकांशी संवाद साधण्याच्या आणि जीवनातील काही अनुभवांचा आनंद घेण्याच्या आमच्या क्षमतेमध्ये अडथळा आणू शकतात. काही उदाहरणे अशी आहेत:

- "मी आपल्या वडिलांसारखा किंवा आईसारखा होणार नाही" (कोणीतरी ज्याच्या बालपणाच्या आठवणी दुःखद आहेत).

- “मी कधीही मुले होऊ देणार नाही” (लहान मुलांच्या शाळेत काम करणाऱ्या किंवा मुलांच्या चर्चमध्ये सेवा करणाऱ्या कोणाला तरी मुलांसोबत समस्या आल्या).
- “मुले इतकी भयंकर आहेत” (जेव्हा आईवडिल सारखे म्हणत राहतात की त्यांची मुले भयंकर आहेत, ती खरोखर भयंकर निघू शकतात).
- “मी कधी यौनक्रिडा करणार नाही” (यौन शोषण आणि शारीरिक शोषणास बळी पडलेले).
- “मला पुरुषांचा तिटकारा आहे” (स्त्रिया).
- “मी दुसऱ्या कोणत्याही पुरुषाला (स्त्रीला) पुन्हा माझ्याजवळ येऊ देणार नाही” (नाते तुटल्यानंतर).

## मागील पिढ्यांद्वारे स्वीकारलेले शाप

मागील पिढ्यांद्वारे स्वेच्छेने शाप स्वीकारण्यात आले असतील आणि त्याद्वारे येणाऱ्या पिढ्या प्रभावित झाल्या असतील.

**मत्तय 27:25**
**सर्व लोकांनी उत्तर दिले की, “त्याचे रक्त आमच्यावर व आमच्या मुलाबाळांवर असो.”**

## व्यक्तींवर/कुटुंबातील सदस्यांवर उच्चारलेले मंत्र/जादूटोना

भूतसिद्धी अथवा जादूटोना करणारे लोक स्वेच्छेने लोकांवर किंवा संपूर्ण कुटुंबांवर मंत्र टाकतात, आणि याद्वारे पिढीजात बंधनांचे दार उघडते.

## कौटुंबिक वारश्याने मिळालेल्या वस्तूचे असणे ज्या घृणित असू शकतात

ज्याला कौटुंबिक वारश्याने मिळालेली उत्तम वस्तू समजले जात असेल, ज्याची हाव कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस असेल, त्याद्वारे कदाचित शाप येत असेल. असे होऊ शकते की कदाचित ती वस्तु कुठल्यातरी जादूटोण्याच्या कृत्यात खोट्या दैवतास अर्पण करण्यात आली असेल. त्या वस्तूच्या पृष्ठभूमीविषयी अज्ञान असल्यामुळे ती घरात आणण्यात आली आणि आमच्या घराची सजावटी वस्तू ठरली, ही वस्तू बंधनात आणू शकते.

**अनुवाद 7:25-26**
**25 त्यांच्या देवांच्या कोरीव मूर्ती तुम्ही अग्नीत जाळून टाका; त्यांच्यावरील सोन्यारुप्याचा लोभ धरू नकोस व ते स्वतःकरता ठेवून घेऊ नकोस, घेशील तर त्यामुळे पाशात पडशील; कारण तुझा देव परमेश्वर ह्याला त्याचा वीट आहे.**

**26 कोणतीही अमंगळ वस्तू आपल्या घरी आणू नकोस, आणशील तर तूही तिच्याप्रमाणे नाशास पात्र ठरशील; तिचा अगदी वीट मान व तिचा पूर्णपणे अव्हेर कर, कारण ती नाशास पात्र ठरलेली वस्तू आहे.**

## कुटुंब प्रमुखांचे (वडिलांचे) निर्णय

पित्यांद्वारे घेण्यात आलेले निर्णय फार महत्वाचे असतात कारण ते त्यांच्या कुटुंबांचे आध्यात्मिक प्रमुख आहेत. अनेकदा, पूर्वजांच्या बंधनांचे कारण जादूटोण्यात किंवा कुठल्यातरी धार्मिक संघटनेत त्यांचा सहभाग असू शकते. कधी कधी असे वाटते की ज्योतिष्यास दिलेली भेट हानिकारक नव्हती, पण ती पिढीजात बंधनासाठी दार उघडू शकते. ज्योतिष पाहण्यात सहभाग, हस्तरेखा पाहणे, जन्मकुंडली, सम्मोहन, फ्रीमॅस्नरी, तावीज घालणे, मूल्यवान खडा (बर्थस्टोन), गंडेदोरे, आणि या सारख्या वस्तूंमध्ये कुटुंब प्रमुखाचा सहभाग त्यांच्या मुलांमध्ये दुरात्म्यांच्या कार्यासाठी दार उघडू शकतो आणि त्याचा परिणाम पुढील पिढ्यांवरही घडू शकतो.

# 4. वैय्यक्तिक आणि कौटुंबिक बंधने ओळखणे

**योहान 10:10**

**चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करायला येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.**
**परमेश्वराची अशी इच्छा आहे की आम्हास विपूल जीवन प्राप्त व्हावे - जास्तीत जास्त जीवन. चोरी करणारा, घात करणारा, आणि नाश करणारा सैतान आहे.**

जी कौटुबिक बंधने अनेकप्रकारे कुटूंबास प्रभावित करतात त्यांस समजून घेतल्यानंतर, आम्हाला आपल्या स्वतःच्या जीवनांचे आणि आमच्या कुटूंबांच्या जीवनांचे हे पाहण्यासाठी परीक्षण करण्याची गरज आहे की त्यामागे पिढीजात बंधनाची चिन्हे तर नाहीत. आम्ही आमच्या आत्मिक जीवनांची एक आत्मिक यादी तयार करावी आणि कोणत्याही वैयक्तिक आणि पिढीजात बंधनास नष्ट करण्याविषयी कार्रवाई करावी.

## कारण आणि परिणाम नेहमीच संबंधित असू शकत नाहीत

आपण हे लक्षात घेतले पाहिजे की कारण आणि परिणाम नेहमीच संबंधित असू शकत नाहीत. उदाहरणार्थ, अशी व्यक्ती असू शकते जी नोकरीत टिकून राहूच शकत नाही. हे शक्य आहे की दर सहा महिन्यांनी, ही व्यक्ती नवीन नोकरी हाती घेते. अशा परिस्थितीत, खरे कारण काय असू शकते याचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, आम्हास हे कळून येते की त्या व्यक्तीचे लोकांशी शत्रुत्व असू शकते आणि शेवटी कामाच्या ठिकाणी ती लोकांशी भांडण करते. सहकाऱ्यांशी शत्रुत्व हे कारण असू शकते परंतु त्याचा परिणाम नोकरीवर टिकून न राहण्यात होतो. हिंसाचाराची भावना असू शकते ज्यामुळे या  व्यक्तीचे सहकाऱ्यांशी आणि जवळपासच्या लोकांशी पटत नाही आणि तिला त्यांच्या संपर्कात राहता येत नाही.

दुसऱ्या उदाहरणाचा विचार करा जेथे एका विशिष्ट कुटुंबात अनियंत्रित रागाचे पिढीजात बंधन आहे. या कुटुंबातील एक तरुण लग्न करतो आणि या प्रकारच्या वागणुकीला पुढे चालू ठेवतो, परिणामी त्याचे स्वतःचे लग्न मोडते आणि शेवटी त्याची परिणती घटस्फोटात होते. याचे कारण अनैसर्गिक रागाचे पिढ्यानपिढ्याचे बंधन आहे तर त्याचा परिणाम म्हणजे विवाह मोडणे.

आपण आपल्या जीवनाचे परीक्षण करण्यासाठी आणि वैयक्तिक किंवा कौटुंबिक बंधने ओळखण्यासाठी वेळ आणि मेहनत घेतली पाहिजे. आपल्या जीवनात पिढ्यानपिढ्याची बंधने आहेत का हे तपासण्यासाठी आपण आपले जीवन आणि आपल्या कुटुंबांचे जीवन तपासू या. आपल्या विस्तारित कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा विचार करू या आणि काही अयोग्य वर्तन किंवा

वारंवार येणाऱ्या समस्या आहेत का हे ओळखण्यासाठी पुन्हा पुन्हा घडणाऱ्या समस्या ओळखण्याचा प्रयत्न करू या. कदाचित, आमच्या आजोबांच्या पिढीमध्ये अकाल मृत्यू असू शकतो. मग एक काका सुद्धा त्यांच्या तारुण्यातच वारले असावेत आणि आता आमच्या पिढीत असे घडेल या भीतीने आम्ही जगत असू. पिढीजात बंधन म्हणून एखाद्या गोष्टीची ओळख होत असेल, तर आपण दार बंद केले पाहिजे. असे करून, ते भावी पिढ्यांपर्यंत जाऊ नये याची काळजी घेऊ या. जर आपण आपल्या जीवनात एखाद्या गोष्टीसाठी दोषी असू ज्यामुळे बंधनाचे दरवाजे उघडले जाऊ शकतात, तर आपण पश्चात्ताप केला पाहिजे, त्यांचा त्याग केला पाहिजे आणि स्वतंत्रपणे चालले पाहिजे!

## आपण स्वतंत्र होऊ शकतो!

चांगली बातमी अशी आहे की जेव्हा आपल्याला सत्य कळेल तेव्हा सत्य आपल्याला बंधमुक्त करेल. येशू ख्रिस्त आपल्याला बंधमुक्त अर्थात स्वतंत्र करू शकतो!

**योहान 8:32,36**

**32 तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील.**

**36 म्हणून जर पुत्र तुम्हांला बंधमुक्त करील तर तुम्ही खरेखुरे बंधमुक्त व्हाल.**

# 5. आपण यापासून मुक्त होऊ शकतो का?

### आमचे स्वातंत्र्य वधस्तंभावर मिळविण्यात आले होते

**1 योहान 3:8**

**पाप करणारा सैतानाचा आहे; कारण सैतान प्रारंभापासून पाप करत आहे. सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रकट झाला.**

आमचे स्वातंत्र्य वधस्तंभावर मिळविण्यात आले. येशू सैतानाच्या प्रत्येक कार्याचा नाश करण्यासाठी आला, मग त्याने आमच्या जीवनात कशाही पद्धतीने प्रवेश मिळविलेला का असेना.

येशू या जगात का आला? येशू आम्हाला अनुसरण करण्यासाठी नवा धर्म देण्यास आला नाही किंवा विचार करण्यासाठी नवीन तत्वज्ञान देण्यास आला नाही. तो लोकांच्या जीवनातील सैतानाच्या प्रत्येक कार्याचा नाश करावयास आला. आम्हाला आमच्या जीवनात सैतानाच्या कार्यांस सहन करण्याची गरज नाही.

या जगात आज अनेक लोक आहेत जे आम्हास नवीन तत्वज्ञान, कल्पना, आणि धर्म देतात. तथापि, कोणीही उठून असे म्हणू शकत नाही की, “मी सैतानाच्या कार्यांचा नाश करू शकतो.” केवळ येशू असे करू शकतो.

**इब्री 2:14**

**ज्या अर्थी ‘मुले’ एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे.**

आपल्या मरणाद्वारे येशूने सैतानाचा, ज्याला मृत्यूचे सामर्थ्य होते, नाश केला आणि त्याला दुर्बळ केले. वधस्तंभ हे पराभवाचे ठिकाण नव्हते. परंतु हे मोठ्या विजयाचे स्थान होते ज्याविषयी इतिहासाने कधीही ऐकलेले नव्हते! वधस्तंभावर येशूने सैतानाचा पराजय केला. त्याला हे स्वतःसाठी करण्याची गरज नव्हती, कारण तो सैतानापेक्षा श्रेष्ठ होता, आहे आणि असेल. त्याने ते आमच्यासाठी केले - आमचा प्रतिनिधी म्हणून आणि आमच्या वतीने.

**कलस्सै 2:14-15**

**14 आपल्याविरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकूल असलेले विधींचे ऋणपत्र त्याने खोडले व वधस्तंभाला खिळून त्याने ते रद्द केले.**

**15 त्याने सत्ताधीशांना व अधिकाऱ्यांना नाडून त्यांच्याविरुद्ध वधस्तंभावर जयोत्सव करून त्यांचे उघडउघड प्रदर्शन केले.**

सत्ताधीश आणि अधिकारी दुरात्मे आणि दुष्टात्मे आहेत. वधस्तंभावर येशूने त्यांची शस्त्रे नष्ट केलीत, आणि त्यांस निर्बळ केले व त्यांच्यावर पूर्णपणे विजय मिळविला.

**इफिस 6:12**

**कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे.**

येशूने सैतानास व त्याच्या दुष्ट सत्ताधिशांना निःशस्त्र केले, त्यांस निर्बळ केले, आणि वधस्तंभावर आपल्या विजयाचे सार्वजनिक प्रदर्शन केले. याच येशूने आमच्या जगात प्रवेश केला आणि आम्हास प्रत्येक आणि कोणत्याही दुष्ट बंधनापासून आज पूर्णपणे स्वतंत्र केले. त्याचा तुमच्यासाठी आणि माझ्यासाठी काय अर्थ आहे?

**कलस्सै 1:13-14**

**13 त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले.**
**14 त्या पुत्राच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे.**

अशा प्रकारे, त्याने आपल्याला अंधाराच्या अधिपत्त्यापासून किंवा अधिकारापासून (दुरात्मे) सोडवले आहे. ज्या क्षणापासून आपण प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवू लागतो, त्या क्षणापासून सैतानाचा आपल्या जीवनावर कोणताही कायदेशीर हक्क ठरत नाही, कारण आपल्याला सोडविण्यात आले आहे आणि स्वतंत्र करण्यात आले आहे. आमचे स्थानांतर एका वेगळ्या राज्यात झाले आहे, अशा प्रकारे आता आपण येशू ख्रिस्ताच्या राज्याचे नागरिक बनलो आहोत. आपण सैतानाच्या राज्याचे नागरिक नाही, आणि म्हणून या अंधाराच्या शक्तींचा आपल्या जीवनावर कोणताही अधिकार नाही आणि आपला आत्मा, प्राण व शरीरावर त्यांचा हक्क नाही. सैतानाला आपल्या जीवनात फक्त एकच अधिकार मिळू शकतो तो म्हणजे आपण त्याला दिलेल्या प्रवेशाद्वारे. पवित्र शास्त्र आपल्याला चेतावणी देते, “सैतानाला वाव देऊ नका” (इफिस 4:27). म्हणून, दरवाजा बंद ठेवा. सैतानाला आपल्या जीवनात कोणताही प्रवेश देऊ नका!

**रक्ताचे सामर्थ्य**

**1 पेत्र 1:18-19**

**18 कारण वाडवडिलांच्या परंपरेने चालत आलेल्या तुमच्या निरर्थक वागणुकीपासून, 'सोने व रुपे' अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे,**
**19 तर निष्कलंक व निर्दाेष कोकरा असा जो ख्रिस्त, त्याच्या मूल्यवान रक्ताने 'तुम्ही मुक्त झाला आहात.'**

पेत्राचे पत्र आशिया मायनरच्या रोमन प्रांतांमध्ये विखुरलेल्या यहूदी आणि गैरयहूदी ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांच्या मिश्र मंडळींना संबोधित केले गेले होते. पेत्र यहूदी आणि गैरयहूदी ख्रिस्ती या दोघांनाही सांगतो की आम्हाला आमच्या पूर्वजांकडून मिळालेल्या निरर्थक वागणूकींपासून सोडवण्यात आले आहे. पेत्र ज्या मुक्तीचे वर्णन करतो ती म्हणजे मूर्तिपूजक धर्म, अंधश्रद्धा आणि परुश्यांची औपचारिकता यांच्या व्यर्थतेपासून मुक्तता आहे.

येशूच्या रक्ताने आमच्यासाठी अनेक गोष्टी केल्या आहेत - त्याद्वारे आमची पापे धुतली गेली आणि आम्हास सैतानाच्या सामर्थ्यापासून मुक्तता मिळाली. ख्रिस्ताच्या रक्ताने आमच्या पूर्वजांच्या परंपरेने चालत आलेल्या निरर्थक जीवनशैलीपासून आम्हास मुक्त केले आहे. आमच्या वाडवडिलांचे पूर्वज अथवा जीवनशैली कोणतीही का असेना ज्याद्वारे उपासनेच्या निश्चित स्वरूपांमुळे दुरात्म्यांच्या प्रभावासाठी दार उघडले असेल, पण ख्रिस्ताचे रक्त आम्हास मुक्त करते! ख्रिस्ताचे वाहिलेले रक्त आम्हास दुरात्म्याच्या बंधनाच्या, पापमय जीवनशैलीच्या, अनैतिक आचरणाच्या, शपथांच्या, अर्पणांच्या, आणि आमच्या पूर्वजांच्या शापांच्या कोणत्याही आणि प्रत्येक जीवनशैलीपासून स्वतंत्र होण्याचा अधिकार देते.

## तुरुंगाची दारे उघडली आहेत - आपण स्वतंत्र जीवन जगण्यासाठी बाहेर पडले पाहिजे

तुरुंगाची दारे उघडली आहेत, आपण स्वतंत्र जीवन जगण्यासाठी बाहेर पडले पाहिजे. येशूने ती प्रत्येक गोष्ट केली आहे जी आम्हास स्वतंत्र करण्यासाठी करण्याची त्याला गरज होती. त्याने आपलेरक्त वाहिले आहे; त्याने सैतानाच्या कामाचा नाश केला आहे आणि सैतानावर विजय मिळविला आहे. आम्हाला दाराबाहेर पडून आमच्या स्वातंत्र्याचा स्वीकार केला पाहिजे आणि ते स्वातंत्र्य ग्रहण केले पाहिजे. येशूने म्हटले, "तुम्हाला सत्य समजेल व सत्य तुम्हाला बंधमुक्त करील. म्हणून जर पुत्र तुम्हाला बंधमुक्त करील, तर तुम्ही खरेखुरे बंधमुक्त व्हाल" (योहान 8:32,36). अज्ञान आम्हाला बंधनात ठेवते. पण सत्य जाणल्याने आम्हास स्वातंत्र्यात चालण्याची संधी मिळते.

### आपण आशीर्वादित आहा!

**इफिस 1:3**
**आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो. त्याने स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद**

**देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे.**

परमेश्वराने आपणास स्वर्गातून येणाऱ्या प्रत्येक आशीर्वादाने आशीर्वादित केले आहे. प्रत्येक आत्मिक आशीर्वाद जो स्वर्गातून येते तो तुमचा आहे, कारण परमेश्वराची आपणासाठी इच्छा आहे की आपण आशीर्वादित व्हावे! परमेश्वर आपल्या विरोधात नव्हे, तर आपल्या पक्षास आहे.

## सर्व दारे कायमची बंद करा

**मत्तय 12:43-45**

**43 अशुद्ध आत्मा माणसातून निघाला म्हणजे तो विसावा शोधत निर्जल स्थळी फिरत राहतो, परंतु तो त्याला मिळत नाही.**
**44 मग तो म्हणतो, 'ज्या माझ्या घरातून मी निघालो त्यात परत जाईन;' आणि तेथे गेल्यावर ते त्याला रिकामे असलेले, झाडलेले व सुशोभित केलेले असे आढळते.**
**45 नंतर तो जाऊन आपणापेक्षा दुष्ट असे दुसरे सात आत्मे आपणाबरोबर घेऊन येतो आणि ते आत जाऊन तेथे राहतात; मग त्या माणसाची शेवटली दशा पहिलीपेक्षा वाईट होते; तसेच ह्या दुष्ट पिढीचेही होईल.**

शत्रू कशाप्रकारे कार्य करतो याविषयी येशू आम्हाला अंतर्ज्ञान देतो. जेव्हा दुरात्म्यांस त्या क्षेत्रातून जे त्यांनी काबिज केले होते, हुसकावून लावले जाते, तेव्हा ते परत येण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच दारे बंद ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. उदाहरणार्थ, जर आपण अश्लीलतेचे दार उघडे ठेवले असेल आणि ते बंधन तोडण्यासाठी आपणास पश्चातापाकडे नेण्यात आले असेल, पण ते दार बंद ठेवण्याऐवजी, आपण अश्लीलतेशी थोडा वेळ खेळत असाल, तर आपली दशा पूर्वीपेक्षा वाईट होईल. याचे कारण हे आहे की, जेव्हा शत्रू परत येतो, तेव्हा तो आणखी मोठ्या तीव्रतेने येतो. जेव्हा आपण काही विशिष्ट प्रकारच्या बंधनांचा त्याग करता, तेव्हा शत्रू त्याच क्षेत्रात ज्यापासून आपण मुक्त होण्याचे ठरविले होते, आणखी तीव्रतेने आक्रमण करू शकतो. शुद्धीकरणाचा प्रभाव तोवरच टिकतो जोवर आपण पश्चाताप न करता सतत पाप करण्याद्वारे सैतानाला पुन्हा प्रवेश करण्याचा हक्क देत नाही. आपण सैतानाला आमच्या जीवनात प्रवेश देणारी सर्व दारे कायमची बंद केली पाहिजेत.

## आमच्या स्वतःच्या पापांसाठी आणि आमच्या पूर्वजांच्या पापांसाठी पश्चाताप करणे आणि त्यांचा त्याग करणे

**लेवीय 26:39-42**

**39 तुमच्यातील जे उरतील ते आपल्या शत्रूंच्या देशांत आपल्या दुष्टतेमुळे खंगत जातील आणि आपल्या**

**वाडवडिलांच्या दुष्टतेमुळे त्यांच्याप्रमाणेच खंगतील.**

**40 त्यांनी माझ्याविरुद्ध अपराध केला ह्यात त्यांची व त्यांच्या वाडवडिलांची दुष्टता होय असे ते कबूल करतील,**

**41 तसेच ते माझ्याविरुद्ध चालले ह्या कारणामुळे मीही त्यांच्याविरुद्ध होऊन त्यांना शत्रूंच्या देशात आणले असे ते कबूल करतील, आणि त्यांचे अशुद्ध हृदय लीन होऊन ते आपल्या दुष्टतेचा दंड मान्य करतील.**

**42 तेव्हा जो करार मी याकोबाशी केला तो मी स्मरेन. त्याचप्रमाणे इसहाकाशी केलेला करार व अब्राहामाशी केलेला करार ह्यांची मी आठवण करीन व त्या देशाचीही मी आठवण करीन.**

येथे परमेश्वर त्याच्या लोकांना सांगत आहे की वर्तमान पिढी मागील पिढीच्या पापांसाठी पश्चाताप करू शकते. आम्हास पवित्र शास्त्रात इतर उदाहरणे देखील आढळून येतात.

**यिर्मया 14:20**

**हे परमेश्वरा, आमची दुष्टता, आमच्या पूर्वजांचे दुष्कर्म, आम्ही जाणतो; आम्ही तुझ्याविरुद्ध पाप केले आहे.**

एज्रा, नहेम्या, आणि दानीएलाने सुद्धा त्यांच्या वाडवडिलांनी केलेल्या पापांसाठी पश्चाताप केला. म्हणून आपल्या पूर्वजांच्या आणि वाडवडिलांच्या पापांसाठी प्रार्थना करणे आणि पश्चाताप करणे तुमच्या आणि माझ्यासाठी पवित्र शास्त्रानुसार आहे.

## परमेश्वराद्वारे नेमलेली अधिकार रचना

स्वाभाविक जगात परमेश्वराद्वारे नेमलेली एक रचना आहे ज्यात परमेश्वर कार्य करतो, आणि सैतान त्याचा मान राखतो.

### पतीचा अथवा पित्याचा अधिकार

**1 करिंथ 11:3**

**प्रत्येक पुरुषाचे मस्तक ख्रिस्त आहे; स्त्रीचे मस्तक पुरुष आहे, आणि ख्रिस्ताचे मस्तक देव आहे, हे तुम्हांला समजावे अशी माझी इच्छा आहे.**

पती आपल्या पत्नीचे मस्तक आहे. पती किंवा पिता आपल्या कुटुंबावर आत्मिक द्वारपाल किंवा पहारेदार आहे. परमेश्वराने नेमलेल्या अधिकार रचनेतून आत्मिक अधिकार प्रवाहित होतो. घरात शत्रूच्या प्रभावाला परवानगी देणे किंवा नाकारणे हे पतीचे कर्तव्य आहे. त्याला पत्नीचे आणि कुटुंबाचे संरक्षण करण्याचा अधिकार आणि जबाबदारी आहे. पतींनी त्यांच्या अधिकाराची जागा घेणे, दरवाजा बंद करणे आणि सर्व दुरात्म्यांच्या शक्तींना हे जाहीर करणे आवश्यक आहे

की त्यांना त्यांच्या पत्नी आणि मुलांवर प्रभाव पाडण्यास मनाई आहे.

### विश्वासणाऱ्या जोडीदाराचा अथवा पालकाचा अधिकार

**1 करिंथ 7:14**
**कारण पत्नीच्या द्वारे ख्रिस्तीतर पती पवित्र झाला आहे आणि ख्रिस्ती पतीच्या द्वारे ख्रिस्तीतर पत्नी पवित्र झाली आहे; असे नसते तर तुमची मुलेबाळे अशुद्ध असती; परंतु आता ती पवित्र आहेत.**

अशाप्रकारे, जर लग्नाचा एक जोडीदार विश्वासणारा नसेल, तर विश्वास करणारा जोडीदार तारण न पावलेल्या जोडीदारावर, आत्मिक बाबींत आत्मिक प्रभाव गाजवू शकतो. जर आपण विश्वासणारे आहात, तर आपण अंतर आणू शकता कारण आपल्या विश्वासाची आपल्या विश्वास न धरणाऱ्या जोडीदारावर सत्ता आहे. या संबंधामुळे मुलेसुद्धा विश्वासणाऱ्या जोडीदाराच्या आत्मिक प्रभावाखाली येतात.

### वर्तमान पिढीचा अधिकार

आम्ही आपल्या कौटुंबिक वंशाचे वर्तमान प्रतिनिधी आहोत म्हणून, आम्हाला त्या सर्व शपथांवर, अर्पणांवर, आणि करारांवर अधिकार आहे जे पूर्वी लेवीय 26:39-42 मध्ये दर्शविल्याप्रमाणे करण्यात आले आहेत.

# सतत विचारले जाणारे प्रश्न

**प्रश्न 1. जेव्हा मी ख्रिस्ताला माझा वैयक्तिक तारणहार म्हणून स्वीकारतो, तेव्हा मी कबूल करतो की त्याचे रक्त मला माझ्या सर्व पापांपासून शुद्ध करते. मी अजूनही माझ्या पूर्वजांच्या अधर्माखाली का आहे? येशूचे रक्त या अधर्मापासून शुद्ध करीत नाही का? जेव्हा परमेश्वराने मला सोडवले आहे, तेव्हा त्याच्या मुक्तीमध्ये सर्व बंधनांपासून मुक्तता समाविष्ट नाही का? मला पिढीजात बंधनांना स्पष्टपणे तोंड देण्याची गरज का आहे?**

जेव्हा आपण येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणहार म्हणून स्वीकारतो, तेव्हा आपण खरोखरच आपल्या आत्म्यात नवा जन्म घेतो आणि नवीन उत्पत्ती बनतो. येशू ख्रिस्ताचे रक्त आपली पापे धुवून टाकते. तथापि, समस्या अशी आहे की आपल्या पूर्वजांच्या अधर्माने प्राणाच्या क्षेत्रावर - मन, इच्छा आणि भावना - शरीर आणि जीवनाच्या अनुभवांवर परिणाम करणाऱ्या दुरात्म्याच्या बंधनांचे दरवाजे उघडले. जेव्हा परमेश्वर आपल्याला तारण देतो आणि येशूच्या रक्ताने आपल्याला स्वच्छ धुतो, तेव्हा तो आपला प्राण, शरीर आणि आपली परिस्थिती बदलत नाही.

उदाहरणार्थ, जर ख्रिस्ताचा स्वीकार केल्यानंतर तुमचे केस पिकले असतील, तर ते नंतरही पिकले राहण्याची शक्यता आहे! किंवा तुमचा नव्याने जन्म होण्यापूर्वी तुम्ही सहा फूट उंच असाल, तर तुम्ही येशूला तुमच्या आयुष्यात स्वीकारल्यानंतरही तुमची उंची समान राहील. क्षणार्धात तुम्ही तुमच्या आत्म्याच्या क्षेत्रात एक नवीन उत्पत्ती बनता, परंतु प्राण, शरीर आणि जीवनातील परिस्थितींच्या क्षेत्रातील अनेक बंधनांचे अस्तित्व कायम असू शकते.

असे अनेक विश्वासणारे आहेत जे परमेश्वराच्या दृष्टीत धुतले गेले आहेत आणि नीतिमान ठरले आहेत परंतु तरीही ते पापमय सवयी, भावनात्मक समस्या आणि यासारख्या समस्यांशी झुंज देत आहेत. म्हणून, ज्या गोष्टींना सामोरे जावे लागेल त्यापैकी एक म्हणजे पिढीचे बंधन.

**प्रश्न 2. निर्गम 20:5-6 नुसार, परमेश्वर त्याचा द्वेष करणाऱ्या लोकांच्या अन्यायाबद्दल शासन करतो आणि जे त्याच्यावर प्रीती करतात, त्यांच्यावर तो दया करतो. मी परमेश्वराचा द्वेष करीत नाही. तर त्याऐवजी, मी त्याच्यावर प्रीती करतो, म्हणून मला कौटुंबिक बंधने तोडण्याविषयी चिंतित राहण्याची गरज का आहे?**

या प्रश्नाचे उत्तर पहिल्या प्रश्नासारखेच आहे. आम्ही आपल्या अंतःकरणापासून परमेश्वरावर प्रीती

करतो, आणि तरीही अनेकदा आमच्या प्राणात व शरीरात बंधने असू शकतात; आणि आमच्या जीवन परिस्थितींत शत्रूची कार्ये असू शकतात ज्यांस आम्ही विशेषतः तोंड द्यावे असे परमेश्वर आम्हास सांगतो. परमेश्वराने असे म्हटले नाही, “मी तुमच्यावतीने सैतानाचा प्रतिकार करणार.” तर त्याऐवजी, तो म्हणतो, “तुम्ही स्वतःचा प्रतिकार करा.”

## प्रश्न 3. जोवर मी पिढीजात बंधनांपासून मुक्त होत नाही तोवर मी पिढीजात आशीर्वादांची सुरूवात करू शकत नाही काय?

जेव्हा आपण ख्रिस्तामध्ये येता, तेव्हा आपण आपोआपच अब्राहामाच्या आशीर्वादाची आणि आपण ख्रिस्ताठायी जे आहात त्याच्याशी संबंधित आशीर्वादांची घोषणा करणारे ठरतो. अशाप्रकारे, आपण जरी अद्याप पिढीजात बंधनांत असाल ज्यांस समोरे जाण्याची गरज आहे, तरीही आपण आपल्या वंशजांसाठी पिढीजात आशीर्वादांची सुरूवात व घोषणा करू शकतो. तथापि, ज्याप्रमाणात आपण येणाऱ्या पिढ्यांवर प्रभाव टाकणार आहात ते मोठ्या प्रमाणात परमेश्वराप्रत आपल्या आज्ञाधारकपणाच्या पातळीवर; आपण आपले आयुष्य कसे जगता त्यावर अवलंबून आहे. जर आपण आळसी आहात आणि असा विचार करता, “माझे तारण झाले आहे. मला माझा ‘अग्नीचा विमा’ मिळाला आहे. हे माझ्यासाठी पुरेसे आहे! मी स्वर्गात जाणार,” आणि आयुष्यात “तरंगात” राहतो, तर येणाऱ्या पिढ्यांवर आपण आत्मिकरित्या कदाचित फारसा प्रभाव टाकणार नाही. परंतु जर आपण असे व्यक्ती असाल जो परमेश्वरामागे लागला आहे आणि परमेश्वराच्या गोष्टींचा पाठपुरावा करीत आहा - त्याचा आत्मा आणि त्याचे वचन - तर मग येणाऱ्या पिढ्यांवर आपला मोठा प्रभाव पडेल.

## प्रश्न 4. आपल्या सर्व कुटूंबासाठी ख्रिडीत उभा राहून मी क्षमा मागू शकतो काय, अथवा कुटूंबाच्या प्रत्येक सदस्याने हे वैय्यक्तिकरित्या केले पाहिजे?

परमेश्वर अधिकार रचनेच्या माध्यमाने कार्य करतो जी त्याने स्थापित केली आहे. त्या अधिकार रचनेमुळे, आपणास कुटूंबातील सदस्यांवर काही प्रमाणात अधिकार लाभू शकतो जे आपल्यापूर्वी होऊन गेले, पण आपल्या आत्मिक निर्णयांचा जास्तीत जास्त प्रभाव आपल्या मागून येणाऱ्यांद्वारे अनुभव केला जाईल, जे आपल्या प्रभावाच्या क्षेत्राधीन आहेत. जर ही बाब अशा कुटूंब सदस्यांविषयी असेल जो आपल्यापेक्षा मोठा आहे किंवा बरोबरीचा आहे तर त्यांना स्वतःचे निर्णय घ्यावे लागतील, पण आपण आपल्या प्रार्थनेद्वारे त्यांच्यावर प्रभाव टाकू शकता. आपण आपल्या कुटूंब रेषेचे वर्तमान प्रतिनिधी आहोत, म्हणून आम्हास पूर्वी घेण्यात आलेल्या शपथांवर, करण्यात आलेल्या अर्पणांवर आणि करारांवर अधिकार आहे आणि जे बदल आम्ही घडवून आणू

त्याचा आमच्या मागून येणाऱ्यांवर प्रभाव पडेल.

### प्रश्न 5. ज्याद्वारे पिढीजात बंधन उत्पन्न होते त्या अन्यायाचे अथवा अधर्माचे कारण/मूळ जाणणे/शोधणे आवश्यक आहे काय?

लोकांनी जे पाहिले आहे ज्या आधारे, अनेक उदाहरणांत शपथा आणि शापांचा सामान्य त्याग कौटुंबिक बंधने तोडण्यासाठी पुरेसा आहे आणि वाडवडिलांच्या शपथा, अर्पणे, आणि या सारख्या इतर गोष्टींद्वारे सैतानास मिळालेला प्रवेश तोडणे पुरेसे आहे. पण क्वचितच हे बंधन सुरू राहते आणि त्याचा थोडा सखोल आणि गंभीर परिणाम असतो. यासाठी, आम्हाला त्यात विशिष्ट उलटफेर करण्यासाठी त्याच्या मुळाशी जाण्याची आणि त्यात कसा प्रवेश मिळाला आणि कोणत्या पूर्वजाने शत्रूला कुटूंब वृक्षात अधिकार दिला हे जाणून घेण्याची गरज भासते. बरेचदा, पवित्र आत्मा आम्हाला उत्तर देतो, अथवा आमच्या कौटुंबिक इतिहासाशी परिचित असलेल्या लोकांकडून आम्हाला माहिती मिळू शकते.

### प्रश्न 6. शाप विश्वासणाऱ्यांस प्रभावित करतात काय?

याचे उत्तर आहे "नाही." "याकोबावर काही मंत्रतंत्र चालावयाचे नाहीत; इस्राएलावर काही चेटूक चालावयाचे नाही" (गणना 23:23अ). तथापि, ज्या प्रमाणात आम्ही सैतानाला संधी देतो, त्या प्रमाणात त्याला प्रवेश प्राप्त होतो. उदाहरणार्थ, जेव्हा विश्वासणारे जादूटोण्यात सहभागी होतात, त्यांच्या जीवनांत भयास जागा देतात, किंवा सैतानास प्रवेश देतात, तेव्हा ते सैतानाच्या गतिविधीपुढे दुर्बळ ठरतात. म्हणून, विश्वासणाऱ्यांसाठी परमेश्वराच्या आज्ञेत चालणे महत्वाचे आहे.

### प्रश्न 7. आमचा परमेश्वर ईर्ष्यावान का आहे?

जेव्हा आपण पवित्र शास्त्राचे अध्ययन करता, तेव्हा दरवेळी आपण वाचतो की परमेश्वर स्वतःचा उल्लेख ईर्ष्यावान परमेश्वर म्हणून करतो, तेव्हा ते इतर दैवतांची अथवा खोट्या दैवतांची उपासना करण्याच्या संदर्भात असते. परमेश्वर तेव्हा ईर्ष्यावान ठरतो जेव्हा आपण खोट्या दैवतांची उपासना करतो कारण :

- यामुळे मूळ हेतूचे उल्लंघन होते, हा हेतू आहे जिवंत परमेश्वराची उपासना करणे. आम्हास केवळ त्याची उपासना करण्यासाठी घडविण्यात आले होते. *"कारण तुला दुसऱ्या कोणत्याही देवाला नमन करायचे नाही; कारण ज्याचे नाव ईर्ष्यावान आहे, तो परमेश्वर ईर्ष्यावान देव*

*आहे"* (निर्गम 34:14).

- तो आपले गौरव दुसऱ्याला देणार नाही. *"मी परमेश्वर आहे; हे माझे नाम आहे; मी आपले गौरव दुसऱ्यास देऊ देणार नाही; मी आपली प्रशंसा मूर्तींना प्राप्त होऊ देणार नाही"* (यशया 42:8). जेव्हा परमेश्वराला द्यावयाचे गौरव आणखी कोणाला दिले जाते, तेव्हा ते परमेश्वरास सहन होत नाही.

- आपण परमेश्वराचे चुकीचे प्रतिनिधित्व करीत आहोत. त्यामुळे परमेश्वराची ओळख अशा वस्तूशी जुळते जी त्याने उत्पन्न केली, जो तो खरोखर आहे - उत्पन्नकर्ता म्हणून त्याच्याशी नव्हे. *"मी कोणाशी तुल्य आहे म्हणून त्यांची उपमा मला तुम्ही द्याल असे पवित्र प्रभू म्हणतो"* (यशया 40:25). उदाहरणार्थ, जर कोणाला आपले छायाचित्र घ्यावयाचे असेल, तो आपले डोके कापतो, त्या ठिकाणी झुरळाचे डोके ठेवतो आणि म्हणतो की हे आपले चित्र आहे, तर ते आपणास आवडेल काय? आपण त्याविषयी प्रसन्न होणार नाही पण "ईर्ष्यावान" व्हाल - अर्थात त्यांनी तसे केले म्हणून आपणास राग येईल. जेव्हा आपण उत्पन्नकर्त्याऐवजी सृष्ट वस्तूची उपासना करतो, तेव्हा आपण अगदी तसेच करतो. आपण परमेश्वराचे चुकीचे चित्र मांडतो, आणि म्हणून परमेश्वर ईर्ष्यावान आहे.

### प्रश्न 8. "ख्रिस्ती मूर्ती" सुद्धा चूक आहेत का?

कुठलीही मूर्ती किंवा प्रतिमा जी उपासना, मनन, किंवा भक्तीचा विषय ठरते - मग आपण त्याला कुठलेही नाव का देईना, अथवा कोणाचेही चुकीचे चित्र का मांडत असेना, ते चुकीचे आहे, मग ते ख्रिस्ती उपासनेच्या स्थळी का असेना.

आपण बाळ येशूच्या, तरुण येशूच्या, मध्यवयीन येशूच्या मूर्तीची किंवा चित्राची उपासना करता कामा नये किंवा त्याजपुढे मेणबत्ती लावता कामा नये! ते चित्र खरोखर येशूचे आहे हे आपणास कसे ठाऊक? ते आणखी कोणी असू शकते आणि आपण त्या व्यक्तीपुढे मेणबत्ती पेटवित असाल आणि फुले वाहत असाल. परमेश्वर म्हणतो, "तुम्ही कोणत्याही माश्यांची अथवा सरपटणाऱ्या किटकांची प्रतिमा करू नका..."

मूर्तीपुढे "ख्रिस्ती" हे उपपद जोडणे आणि म्हणणे की आपण त्याद्वारे परमेश्वराची उपासना करीत आहोत, हास्यास्पद आहे. आपण "आत्म्याने व खरेपणाने" परमेश्वराची उपासना करावी (योहान 4:23-24).

### प्रश्न 9. मेणबत्ती पेटविण्यात काय चुकीचे आहे?

मेणबत्ती पेटविणे स्वतःमध्ये चुकीचे नाही, पण सांकेतिक आहे. असे आपण अनेक कारणांनी करतो: वीज गेल्यानंतर उजेड करण्यासाठी, वाढदिवसाच्या वेळी, लग्नाच्या वेळी ऐक्याचे प्रतीक म्हणून, उत्तम वातावरणासाठी, आणि या सारख्या इतर गोष्टींसाठी. तथापि, जेव्हा मूर्तीची किंवा प्रतिमेची पूजा म्हणून हे केले जाते तेव्हा आपण या तथ्याचे उल्लंघन करतो की आपणास आत्म्याने व खरेपणाने उपासना करावयाची आहे (योहान 4:23-24). जर आपण असा विचार करता की आपण त्याच्या चित्रापुढे मेणबत्ती पेटविली तर त्याला बरे वाटेल, किंवा तो आपल्या प्रार्थनांची उत्तरे देईल कारण अग्नीच्या ज्वाला आपल्या प्रार्थना वर स्वर्गास नेतील, तर आपण स्वतःची फसवणूक करीत आहात. बायबल म्हणते की परमेश्वराची उपासना आत्म्याने व खरेपणाने करावी, मेणबत्ती व अग्नीच्या मदतीने नव्हे!

### प्रश्न 10. माझ्या घरात राहणाऱ्या सोबत्याजवळ/जोडीदाराजवळ मूर्ती आहे. त्याचा माझ्यावर प्रभाव पडेल का?

नाही. बायबल म्हणते की आपण अशा जगात राहतो जे दुष्ट सैतानाच्या नियंत्रणाखाली आहे (1 योहान 5:18-19). जेथे कोठे आपण जातो, तेथे आमच्या सभोवताली वाईटाची (दुरात्म्यांची) उपस्थिती आहे, आम्ही त्यांना पाहू शकत नाही. म्हणून, आपल्या सोबत्यासोबत किंवा जोडीदारासोबत घरात मूर्ती असल्यास त्याचा प्रभाव आपणावर पडणार नाही, जोवर आपण स्वतःस परमेश्वराने आपल्याला दिलेल्या वचनाद्वारे स्वतःचे रक्षण करता. म्हणून, आपणास घाबरण्याची गरज नाही. स्वतःस शुद्ध करा, घरातील जागा स्वच्छ ठेवा, आणि सर्वकाही ठीक होईल. दुष्ट सैतान परमेश्वराद्वारे जन्मलेल्या व्यक्तीस स्पर्श करू शकत नाही. भितीद्वारे किंवा मूर्तींच्या उपासनेद्वारे दुष्ट सैतानाला प्रवेश देऊ नका. लक्षात ठेवा की तुमच्यामध्ये वस्ती करून राहणारा त्याच्यापेक्षा मोठा आहे (1 योहान 4:4).

### प्रश्न 11. परमेश्वर हे (पिढीजात बंधन) करतो का किंवा ते करणारा सैतान आहे?

हे समजून घ्या की पूर्वजांच्या पातकांनी, शपथांनी, आणि अर्पणांनी दुरात्म्यांच्या प्रभावासाठी आणि बंधनासाठी दारे उघडली आहेत. संपूर्ण बायबलमध्ये, असे परिच्छेद आहेत जेथे परमेश्वर म्हणतो की तो काहीतरी “करतो” किंवा “रोग पाठविल, बहरे आणि मुके करील अथवा दुरात्मा पाठविल.” संपूर्ण पवित्र शास्त्राच्या प्रकाशात याचा खरा अर्थ हा आहे की परमेश्वर ते स्वतः “करीत नाही.” ते करणारा सैतान आहे.

परमेश्वराचे हे विधान आहे की तो प्रत्येक व्यक्तीचे रक्षण करतो. येशू म्हणतो की परमेश्वर त्याचा सूर्य चांगल्यावर आणि वाईटावरही प्रकाशित करतो, चांगल्यावर आणि वाईटावर पाऊस पाठवितो. तथापि, जेव्हा व्यक्ती परमेश्वराच्या इच्छेचे किंवा नियमाचे उल्लंघन करते, तेव्हा ती अशा क्षेत्रात जाणूनबुजून प्रवेश करते जेथे शत्रू इजा, हानि आणि नाश घेऊन येतो. आपण त्यासाठी परमेश्वरास दोष देऊ शकत नाही. व्यक्तीच्या कार्याचा परिणाम म्हणून तो परमेश्वराने दिलेल्या दैवीय संरक्षणातून बाहेर पडतो, अशाप्रकारे सैतानाला प्रभाव टाकण्याची, वर्चस्व गाजविण्याची, आणि दबाव टाकण्याची संधी देतो. परमेश्वर लोकांस स्वतः निवड करण्याची आणि आपल्या मार्गाने जाण्याची संधी देतो. सामान्यतः लोक जो मार्ग निवडतात, तो त्यांस अशा ठिकाणी नेतो जेथे सैतान त्यांस बंधनात टाकतो. परमेश्वराने त्याची ओळख असे म्हणत प्रगट केली आहे, “मी तुमचे रोग बरे करणारा परमेश्वर आहे.” त्याने कोठेही असे म्हटले नाही की, “मी तुमचा प्रभू, रोग देणारा आहे.” आधुनिक भाषेत म्हणावयाचे झाले म्हणजे, तो आपला “वैद्य” अथवा डॉक्टर आहे.

सोप्या शब्दात सांगावयाचे झाले म्हणजे, जेव्हा आपण आजारी पडता तेव्हा आपण डॉक्टरकडे असे म्हणत जाता का, “डॉक्टर! जर आज आपली पवित्र इच्छा असेल, जर लोकांस बरे करण्याच्या मनस्थित आपण असाल, जर आपणास प्रसन्नता वाटत असेल, तर आपण कृपा करून माझ्यात काय चूक आहे ते पाहाल काय आणि मला बरे वाटावे म्हणून काहीतरी कराल काय?” जेव्हा आपण डॉक्टरजवळ जातो तेव्हा आपली स्पष्ट अपेक्षा ही असते की आम्हास बरे करण्यासाठी, त्याने आपली सर्व योग्यता व ज्ञान कामी लावावे, आणखी वाईट करण्यासाठी नव्हे. पण, परमेश्वरासोबत आमच्या नात्यामध्ये आम्ही दुप्पट मानदंड राखतो, ज्याने असे म्हटले आहे, “मी यहोवा राफा (तुमचा रोग बरे करणारा, तुमचा वैद्य), यहोवा यिरे (तरतूद करणारा), यहोवा निस्सी (तुम्हाला विजय देणारा), तुमचा रक्षणकर्ता, तुमचे नीतिमत्व आहे” आणि आम्ही त्याला विनंती करतो, “जर आपली पवित्र इच्छा असेल तर मला बरे करा.” बरे करणे आणि आशीर्वाद देणे ही परमेश्वराची इच्छा आहे. जेव्हा आपण डॉक्टरशी तसे बोलत नाही, तर मग आपण प्रभूशी तसे का बोलतो? दुसरे सर्वसामान्य उदाहरण हे होईल की परमेश्वर सर्व लोकांस स्वर्गाचे निमंत्रण देतो, नरकाचे नाही आणि तरीही लोक स्वर्गाऐवजी नरकाची निवड करतात! परमेश्वर त्यांना तेथे पाठवत नाही आणि यासाठी त्याला दोष देता येत नाही. म्हणून, पिढीजात बंधने आणणारा परमेश्वर नाही. आमच्या पापमय कृत्यांमुळे हे सैतानाचे काम आहे.

# तयारी

- पूजेच्या मूर्ती किंवा वस्तू ज्या होत्या आणि उपयोग केल्या जात आहेत, काढून टाका. शंका असल्यास, त्या वस्तू दूर करा.

- जादूटोण्याशी असलेला कुठल्याही प्रकारचा सहभाग सोडून द्या - सम्मोहन, जादूटोणा, ज्योतिषशास्त्र, जन्मकुंडली, मन वाचणे, संख्याशास्त्र, हस्तरेषा वाचणे, ताविज, गंडेदोरे, मूल्यवान खडे, भाग्याचे प्रतीक, राशी भविष्य, हेवी मेटल किंवा रॉक संगीत - ज्यामुळे अधर्मास चालना मिळते.

- खोट्या धर्मांशी सहभाग सोडून द्या (यहोवाचे साक्षी, फ्री मॅसनरी), पंथ, खोट्या दैवतांची उपासना, परमेश्वराच्या वचनाच्या विरूद्ध असलेले तत्वज्ञान सोडून द्यावे.

- येशूने वधस्तंभावर जे साध्य केले त्यावर विश्वास ठेवा आणि, आपल्या वाडवडिलांची निष्ठा काही का असेना, आपण ख्रिस्ताशी एकनिष्ठ राहाण्याची प्रतिज्ञा घ्या.

- परमेश्वरप्रत पूर्ण आज्ञापालनास समर्पित असा.

- जर आपणास आशीर्वादित व्हावयाचे असेल, तर परमेश्वरास आपला दसवांश आणि देणग्या द्या. त्याच्या वचनाचे पालन करा. पवित्र जीवन जगा.

- पवित्र आत्म्यास विनंती करा की त्याने आपणास अशी क्षेत्रे दाखवावी ज्यात आपण आणि आपले पूर्वज बंधनात असतील, ते लक्षात ठेवा, आणि त्या बंधनांपासून मुक्त होण्यासाठी खालील प्रार्थना करा.

# प्रार्थना

*प्रभु येशू, माझा विश्वास आहे की तू माझ्यासाठी वधस्तंभावर मरण पावलास. वधस्तंभावर, मला सैतानाच्या प्रत्येक सामर्थ्यापासून मुक्त करण्यासाठी तुझे रक्त सांडले. तुझे रक्त मला व्यर्थ आणि निरर्थक जीवनशैलीपासून मुक्त करण्यासाठी सांडले गेले आणि अशा जीवनाचे परिणाम माझ्या पूर्वजांकडून मला दिले गेले. तू माझ्यासाठी जे काही केले आहेस त्यामुळे आज मी माझ्या स्वातंत्र्याचा दावा करतो.*

*मी पश्चात्ताप करतो आणि माझ्या आयुष्यातील प्रत्येक पाप आणि बंड सोडतो. मी माझ्या पापाच्या आणि बंडाच्या परिणामांपासून माझे स्वातंत्र्य स्वीकार करतो.*

*मी पश्चात्ताप करतो आणि माझ्या पूर्वजांच्या जीवनातील प्रत्येक पापाचा आणि बंडखोरीचा त्याग करतो. त्यांच्या पापाच्या आणि बंडखोरीच्या परिणामांपासून मी माझे स्वातंत्र्य स्वीकार करतो.*

*येशू ख्रिस्ताच्या नावाने आणि त्याच्या रक्ताच्या सामर्थ्याने, माझ्या पूर्वजांकडून माझ्या जीवनात आलेल्या प्रत्येक बंधनावर आणि शापांवर मी अधिकार घेतो. मी प्रत्येक बंधन तोडतो आणि प्रत्येक शाप आणि त्याचे सर्व परिणाम रद्द करतो.*

*मी त्या सर्व शपथा, व्रतवैकल्ये, शाप, अर्पण, पापमय कृत्ये, आघात, करार, निष्ठेची प्रतिज्ञा रद्द करतो ज्यामुळे माझ्या वडिलांच्या किंवा माझ्या आईच्या वंशाद्वारे सैतानास प्रवेशाचा हक्क मिळाला, ज्यात इतरांच्या आणि स्वतः लादलेल्या शापांचा समावेश आहे.*

*येशूच्या नावाने आणि ख्रिस्ताच्या रक्ताच्या सामर्थ्याने, मी माझ्या जीवनावर परिणाम करणाऱ्या शत्रूचे सर्व सामर्थ्य आणि प्रभाव मोडतो.*

*मी स्वतंत्र आहे, कारण येशूने मला स्वतंत्र केले आहे!*

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळयांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर" च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता:

Account Name: All Peoples Church

Account Number: 0057213809

IFSC Code: CITI0000004

Bank: Citibank N.A., No. 5,

M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

कृपया लक्षात ठेवाः ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!

FREE PUBLICATIONS

A Church in Revival*
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks*
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change*
Code of Honor
Divine Favor*
Divine Order in the Citywide Church
Don’t Compromise Your Calling*
Don’t Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God’s Purpose for Your Life
Giving Birth to the Purposes of God*
God Is a Good God
God’s Word
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife*
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don’t Take Them
Open Heavens*
Our Redemption
Receiving God’s Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith *
The Conquest of the Mind
The Father’s Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus *
The Night Seasons of Life
The Power of Commitment*
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner’s Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power*
The Wonderful Benefits of speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different*
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर apcwo.org/publications उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्या पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई-मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा.

तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : apcwo.org

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4, 5; इबी. 2:3, 4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : www.apcwo.org/locations किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा : contact@apcwo.org

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळयांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या.

ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, “पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे” (रोमियों 6:23). येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो

पाप्यांस तारावयास - आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे - प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

“त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात” (प्रेषितांची कृत्ये 10:43).

“की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल” (रोम. 10:9).

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.

आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि

तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.

## विनामूल्य ॲप डाऊनलोड करा

## ॲपमध्ये  गुगल प्ले स्टोर में “ऑल पीपल्स चर्च, बैंगलोर” शोधा.

दररोज 5 मिनिटांच्या वीडिओच्या माध्यमाने उपासना

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




दररोज बायबल वाचन आणि प्रेयर गाईड

5 मिनिटांच्या उपदेशाचा सारांश

जगात प्रगतीसाठी विविध विषयांवर पवित्र शास्त्राचे टूल किट तसेच सुवार्ता सांगण्यासाठी माहिती

उपदेश, उपदेशाच्या टीपा, टी. वी. कार्यक्रम, पुस्तके, संगीत, आणि बरेच काही.

जर हे आपणास आवडले असेल तर इतरांस सांगा.

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र (एपीसी-बीसी) भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌भुत कृत्ये यावर जोर दिला जातो - सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

एपीसी-बीसी मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्निध्य आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत :

Theology and Christian Ministry (C.Th.) में एक वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Theology and Christian Ministry (D.Th.) में दो वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Bachelor in Theology and Christian Ministry (B.Th.) में तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

दर आठवड्यास सोमवार ते शुक्रवार या दरम्यान सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग भरलेले असतात. विद्यार्थी, नोकरी करणारे आणि गृहिणी सर्व या वर्गांमध्ये उपस्थित राहू शकतात आणि दुपारी 1 नंतर कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असलेल्या स्त्री आणि पुरुषांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची सोय आहे. विद्यार्थी दर आठवड्यात दोन ते पाच तास क्षेत्रीय कार्य, विशेष परिसंवाद, दुपारी प्रार्थना आणि उपासना यात घालवतात. दुपारच्या सभा घरून येणार्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. आठवड्याच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना एक किंवा अधिक स्थानिक चर्चेमध्ये सेवा करण्यास प्रोत्साहित केले जाते.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम याबद्दल अधिक माहितीसाठी आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी कृपया या साइटला भेट द्या : apcwo.org/biblecollege

APC-BC is
accredited by the Nations Association
for Theological Accreditation (NATA).

लोक ज्या समस्यांना तोंड देतात त्यांच्यापैकी काहींचे मूळ मागील पिढ्यांमध्ये आढळते. यापैकी काही अशा व्यक्तीद्वारे उत्पन्न झाले असतील जे मागील पिढीत पापमय जीवनशैली घालवित होते, अथवा दुरात्म्यांच्या क्रियाकलापात गुंतलेले असतील. पिढीजात बंधने काय आहेत आणि ही बंधने कशी तोडावीत हे समजणे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. आमचे स्वातंत्र्य वधस्तंभावर प्राप्त करण्यात आले. येशू सैतानाच्या प्रत्येक कामाचा नाश करण्यासाठी आला, मग त्यांचा प्रवेश आमच्या जीवनात कुठल्याही पद्धतीने का झाला असेना.

वैयक्तिक आणि पिढीजात बंधने कशी ओळखावी आणि तोडावी हे समजून घेण्यात हे पुस्तक आमची मदत करते. स्वतंत्र व्हा! येशू आम्हास जे विपुल जीवन द्यावयास आलात ते जगा!

आशीष रायचूर

All Peoples Church & World Outreach
#319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: + 91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org

ALL PEOPLES CHURCH